प्रभात पुणे, सोमवार, दि. ९ मे २०१६



पुणे : स. प. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात बोलताना ॲड. एस. के. जैन. व्यासपीठावर अन्य मान्यवर.

# स.प.च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**पुणे, दि. ८ (प्रतिनिधी) –** स. प. महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. शिक्षण प्रसारक मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. एस. के. जैन हे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी संचालक सतीश पवार, प्रा. दिलीप सेठ, संघटनेचे अध्यक्ष विजय उत्तुरे, राजू चौरे, शिरीष कुलकर्णी इत्यादी उपस्थित होते. या मेळाव्याला १९५७ च्या बॅचपासूनचे अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी महाविद्यालयाच्या जुन्या आठवणींना यावेळी उजाळा दिला. यावेळी उपस्थितांसाठी जितेंद्र भुरूक यांच्या हिंदी मराठी गाण्यांचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.